आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता
३१ मे २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आंबा उत्पादक देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधून प्रतिपादन
- महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी महायुतीचं जागावाटप जाहीर, १७ पैकी भाजपा ११, शिवसेना ४, तर राष्ट्रवादी काँग्रेस २ जागा लढवणार
- म्यामाँमधे एका इमारतीत झालेल्या स्फोटात ४६ जणांंचा मृत्यू, ७० जखमी
- सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीनं पटकावलं पुरुष दुहेरीचं विजेतेपद

**आणि**

- आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा निर्णय, गुजरात टायटन्सची खराब सुरुवात

**<><><><><>**

आंबा उत्पादक देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या १३४ व्या भागात देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधत होते. कोकणातल्या हापूसप्रमाणेच देशाच्या विविध भागात आढळणाऱ्या आंब्याच्या प्रकारांचा उल्लेख करुन त्यांनी आंबा उत्पादनाचा प्रवास गावखेड्यातून जागतिक बाजारपेठेपर्यंत झाला आहे असं सांगितलं.

देशाच्या अनेक भागात उष्णतेची लाट असून, त्यादृष्टीनं नागरिकांनी काळजी घ्यावी असं आवाहन त्यांनी केलं. कोकम सरबत, सोलकढी अशा पेयांचा उपयोग उष्णतेपासून बचावासाठी करावा असं ते म्हणाले. ही पेयं, देशाच्या विविध प्रदेशातल्या परंपरांचा अविभाज्य भाग आहेत, असं ते म्हणाले.

अलिकडेच केलेल्या ५ देशांच्या दौऱ्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. नेदरलँड्स भेटीत 'चोल' साम्राज्य काळातला प्राचीन ताम्रपट भारताला परत करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

क्रीडा क्षेत्रात भारतीय खेळाडूंनी अलिकडेच केलेल्या कामगिरीचा गौरव त्यांनी केला. अलिकडेच झारखंडमध्ये रांची इथं झालेल्या वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय ॲथलेटिक्स महासंघाच्या स्पर्धेत अवघ्या दोन दिवसांत पुरुषांच्या शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीचा राष्ट्रीय विक्रम तीन वेळा मोडीत निघाल्याचा उल्लेखही त्यांनी केला. ही कामगिरी केलेल्या गुरिंदरवीर सिंह आणि अनिमेष कुजूर या दोन्ही खेळाडूंचं कौतुक करत त्यांच्याशी प्रधानमंत्र्यांनी थेट संवादही साधला.

भारतीयांच्या खगोलशास्त्राच्या आवडीबद्दल प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बातमध्ये चर्चा केली. या निमित्तानं आपल्या वेधशाळांचे महत्त्व त्यांनी सांगितलं. तरुणांनी आकाश निरीक्षणाची आवड जोपासावी असं आवाहन त्यांनी केलं.

'नमामि गंगे अभियान अंतर्गतच्या 'डॉल्फिन बचाव रुग्णवाहिका' या उपक्रमाबद्दल आणि डॉल्फिनच्या संरक्षणासाठी होत असलेल्या त्याच्या उपयोगाविषयी देखील त्यांनी सांगितलं.

लोकांची सेवा करण्यासाठी प्रचंड संसाधनांची गरज नसते, तर त्यासाठी फक्त एक चांगला हेतू आणि सातत्यपूर्ण प्रयत्न पुरेसे असतात, असं ते म्हणाले. देशातल्या प्रत्येक गावात आणि शहरात आपल्याला प्रेरणा देणाऱ्या असंख्य गोष्टी घडत आहेत. अनेकदा या प्रयत्नांची फारशी चर्चा होत नाही, नागरिकांनी आपल्या आसपासच्या अशा प्रयत्नांचा शोध घेऊन त्यांची त्यांची दखल घ्यावी असं आवाहन त्यांनी केलं.

**-- होल्ड बाईट - MKB ACHHE KAM - -**

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या आगामी निवडणुकीसाठी महायुतीचं जागावाटप ठरलं असून १७ पैकी भाजपा ११, शिवसेना ४ आणि ऱाष्ट्रवादी काँग्रेस २ जागा लढवणार आहे. भाजपा नागपूर, अहिल्यानगर, धाराशिव, जळगाव, सोलापूर, लातूर, नांदेड, अमरावती, वर्धा- गडचिरोली-चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि सातारा-सांगली या जागा लढवणार आहे. शिवसेना ठाणे, नाशिक, परभणी-हिंगोली आणि यवतमाळ, तर राष्ट्रवादी काँग्रेस पुणे, आणि रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग या जागा लढवणार आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं विधानपरिषदेच्या परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विवेक नवादार यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

या निवडणुकीसाठी उद्या १ जून हा अर्ज भरण्याचा अखेरचा दिवस आहे, तर मतदान आणि मतमोजणी २२ जूनला होणार आहे.

<><><><><>

म्यानमारमधे एका इमारतीत झालेल्या स्फोटात ४६ जणांचा मृत्यू झाला असून ७० जण जखमी झाले आहेत. खाणकामासाठी वापरली जाणारी स्फोटकं या ठिकाणी साठवली होती. ईशान्य म्यानमारमधे काँगटुप या गावात ही घटना घडली. हा भाग तआंग नॅशनल लिबरेशन आर्मी या सशस्त्र गटाच्या नियंत्रणाखाली आहे.

<><><><><>

जनरल एन.एस. राजा सुब्रमणी यांनी आज देशाचे नवीन संरक्षण दलप्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. नवी दिल्लीत साऊथ ब्लॉक प्रांगणात त्यांना मानवंदना देण्यात आली. पाकिस्तान आणि चीनविषयक तज्ज्ञ, अशी ओळख असलेले जनरल सुब्रमणी, यापूर्वी राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात लष्करी सल्लागार म्हणून कार्यरत होते. गेल्या वर्षी ३१ जुलै रोजी लष्कर उपप्रमुख म्हणून ते निवृत्त झाले.

ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन यांनी आज देशाचे २७ वे नौदल प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी यांच्याकडून त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांना संबोधित केलं.

<><><><><>

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीचं विजेतेपद सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीनं जिंकलं आहे. अंतिम सामन्यात आज त्यांनी इंडोनेशियाचे मुहम्मद शोहिबुल फिक्री आणि फजर अलिफान या जोडीचा १८-२१, २१-१७, २१-१६ असा पराभव केला. सात्विक- चिराग जोडीला गेली २ वर्षं विजेतेपदासाठी प्रतीक्षा करावी लागली होती.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी गुजरातमध्ये अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडिअमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात टायटन्स यांच्यात अंतिम लढत सुरु आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

गुजरात टायटन्सची सुरुवात खराब झाली. तिसऱ्याच षटकात कर्णधार शुभमनव गिल १० धावांवर बाद झाला. त्यानंतर साई सुदर्शन, निशांत सिंधू, आणि जोस बटलरही लवकर बाद झाले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरात टायटन्सच्या १४ षटकात ४ बाद ९९धावा झाल्या होत्या.

<><><><><>

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरीत गतविजेती कोको गॉफ हिला अनास्ताशिया पोटापोव्हा हिनं काल पराभवाचा धक्का दिला. पहिला सेट गमावल्यानंतर पुनरागमन करत तिनं तिसऱ्या फेरीचा सामना ४-६, ७-६, ६-४ असा जिंकला. चार वेळा या स्पर्धेचं जेतेपद पटकावणारी इगा श्वियांतेक हिला आज

मार्ता कोस्त्युक हिनं ७-५, ६-१ असं थेट सेट्समध्ये हरवून चौथी फेरी गाठली. एलिना स्वितोलिना हिनं बेलिंडा बेंचिच हिच्यावर अटीतटीच्या सामन्यात ६-४, ६-४, ६-० अशी मात केली. पुरुष एकेरीत फीलिक्स ओजेर अलियासीम यानं ब्रँडन नाकाशिमा याला ५-७, ६-१, ७-६, ७-६ असं हरवलं.

<><><><><>

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशतकोत्तर पहिल्या जयंतीनिमित्त आज त्यांना विविध कार्यक्रमातून आदरांजली वाहण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्याबाई म्हणजे मूर्तीमंत सुशासन, देशभक्ती आणि सांस्कृतिक अस्मितेचं प्रतीक होत्या, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एक्स समाजमाध्यमावर म्हटलंय. महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांनी मुंबईत लोकभवन इथं अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात चौंडी इथं अहिल्याबाई होळकर स्मारकाला भेट देऊन अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, मंत्रिमंडळाचे इतर सदस्य, तसंच राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाण्यात अहिल्यादेवी होळकर स्मारकाचं उद्घाटन झालं. राज्यात इतरत्रही अहिल्यादेवींना आदरांजली वाहण्यात आली. मध्यप्रदेशात महेश्वर इथं अहिल्यादेवी जयंतीनिमित्त नगरगौरव दिवस साजरा करण्यात आला. तसंच उत्तरप्रदेशात कानपूरमधेही विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

//<><><><><>//